I6

N.C.R.B (एन.सी.आर.
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. District (जिल्हा): अहमदनगर P.S.(ठाणे): पाथर्डी

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0937 Year (वर्ष): 2024

Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):04/10/2024 01:10

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence (गुन्हाची घटना):

1. Day(दिवस): दरमियानी दिन
   Time Period (कालावधी):
   Date From (दिनांक पासून): 18/09/2024
   Date To ( दिनांक पर्यंत): 03/10/2024
   Time From (वेळेपासून): 00:00 वजे
   Time To (वेळेपर्यंत): 23:00 वजे

(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

Date (दिनांक ): 03/10/2024 Time (वेळ): 23:43 वजे

(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):

Entry No. (नोंद क्र.): 001

Date & Time (दिनांक आणि वेळ): 04/10/2024 00:31 वजे

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
पश्चिम, 01 किमी Beat No. (बिट क्र.):

(b) Address (पत्ता): पाथर्डी

(c) In case, outside the limit of this Police Station, then
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):

District(State) (जिल्हा(राज्य)):

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** नारायण दगडु राऊत

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1960

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पारपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन क )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा कासार पिंपळगाव,पाथर्डी,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा कासार पिंपळगाव,पाथर्डी,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9029493795

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संजय भिमराव मनवरे | | | 1. रा भगवाननगर, पाथर्डी,,पाथ अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.Inquest Report / U.D. case No., if any
(इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

S.No. UIDB Number
(अ.क्र.) (यु.आय.डी.बी.क्र.)

12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दि.03/10/2024

मी नारायण दगडु राऊत, वय 64 वर्षे, धंदा शेती, मुळ रा. कासार पिंपळगाव, ता.पाथर्डी, जि.अहमदनगर, हल्ली रा. ए टाईप, ए/22/2 सेक्टर- 13, नविन पनवेल, जि.रायगड.
समक्ष फिर्याद देतो की, मी वरील पत्यावर कुटुंबासह राहण्यास आहे. मी व माझा मुलगा गोपाळ राऊत असे दि. 18/09/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर येथे हजर राहुन पोलीस उप अधीक्षक श्री.त्रिपुटे ला.प्र.वि.अहमदनगर यांना एका लोकसेवकाकडुन लाच मागणी होत असले बाबत तक्रार सांगितली. श्री.त्रिपुटे यांनी त्यांचे कार्यालयात हजर असलेले दोन पंच व सापळा पथकातील कर्मचारी यांना त्यांचे कक्षात बोलवुन त्यांचेशी आमची ओळख करुन दिली. श्री.त्रिपुटे यांचे सुचनेप्रमाणे पंचांनी मला माझे नाव व तक्रार विचारली असता मी माझे नाव वरीलप्रमाणे सांगुन माझी तक्रार सांगितली की, '' माझे नावे मौजे कासारपिंपळगाव, ता.पाथर्डी, जि.अहमदनगर येथे गट नं. 148 पैकी क्षेत्र 28 आर, गट नं. 139/2 पैकी क्षेत्र 32 आर, गट नं 139/5 पैकी क्षेत्र 32 आर, गट नं. 72/1/2/1/2 पैकी क्षेत्र 32 आर आणि गट नं. 72/1/2/1/ह क्षेत्र 74 आर अशी शेतजमीन आहे. सदर शेतजमीनीत माझे भाऊ व इतर यांनी अतिक्रमण केले असल्याने सदर अतिक्रमणाबाबत कारवाई होणेकरीता तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांची कमिशनर म्हणुन नेमणुक करण्यात यावी व त्यांनी वर नमुद शेतजमीनीची मोजणी करुन नकाशासह अहवाल सादर करणेबाबत त्यांना सूचना देण्यात यावी अशा आशयाचा दावा मी मा.सह दिवाणी न्यायाधीश, क स्तर, पाथर्डी यांच्या न्यायालयात दाखल केला होता. त्याचा क्रमांक RCS 18/2021 असा आहे. सदर दाव्यावर मा.न्यायालयाने आदेश पारित केला असुन त्या आदेशात तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, पाथर्डी, जि.अहमदनगर यांची कोर्ट कमिशनर म्हणुन नेमणुक करण्यात येत आहे, तसेच न्यायालयीन आयुक्त यांनी स्वतः किंवा त्यांचे कार्यालयातील सक्षम कर्मचारी यांचे मार्फत वर नमुद शेतजमीनीची धारकांच्या वहिवाटीनुसार मोजणी करावी व त्या बाबतच्या वस्तुस्थितीदर्शक नकाशासह अहवाल दोन महिन्यात दाखल करावा
. असे आदेश दि.03/04/2024 रोजी मा.न्यायालयाने दिलेले आहेत. उपअधीक्षक भूमि अभिलेख पाथर्डी यांचेकार्यालयाकडील जावक क्रमांक 1201/2024 दि. 12/08/2024 अन्वये मला कोर्ट कमिशन मोजणीची नोटीस मिळाली. त्याप्रमाणे मी व माझा मुलगा गोपाल राऊत असे दि. 05/09/2024 रोजी मोजणीकरीता कासारपिंपळगाव येथे हजर होतो. उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय पाथर्डी येथील मोजणी करणार श्री. मनवरे एस.बी. यांनी दि. 05/09/2024 रोजी आमच्या वर नमुद क्षेत्रांची मोजणी केली. मोजणी झाल्यानंतर श्री. मनवरे यांनी आमच्या वर नमुद क्षेत्राची मोजणी केल्याच्या मोबदल्यात व मोजणीचा रिपोर्ट आमच्या बाजुने कोर्टात दाखल करण्याकरीता माझेकडे 25,000/-रुपयांची मागणी केली. मी त्यांना 25,000/-रुपये कशाचे? असे विचारले असता त्यांनी ''मी तुमच्या जमीनीची मा.न्यायालय यांच्या आदेशाप्रमाणे मोजणी केलेली आहे. परंतु तुमचे मोजणीमध्ये क्षेत्र कमी भरत आहे त्यात दुरुस्ती करुन मोजणीचा नकाशा व रिपोर्ट तुमच्या बाजुने कोर्टात लवकरात लवकर देण्यासाठी मला 25,000/-रुपये द्यावे लागतील, तरच मी रिपोर्ट व नकाशा सादर करील''असे म्हणाले. मी तातडी मोजणीची शासकिय फी 12,000/-रुपये ही यापुर्वीच भरलेली असल्याने श्री.मनवरे हे माझेकडे मागत असलेले 25,000/-रुपये ही लाच असल्याचे मला समजले. मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही. मला लकवा हा आजार झाल्याने मला माझे दोन्ही हातांनी काही काम करता येत नाही. त्यामुळे आज रोजी मी माझा मुलगा श्री. गोपाल नारायण राऊत यास सोबत घेवुन आलो आहे. माझ्या मुलाने दि. 17/09/2024 रोजी श्री. मनवरे यांना फोन करुन मोजणीच्या रिपोर्टबाबत विचारणा केली असता त्यांनी आम्हाला उदया दि. 18/09/2024 रोजी ते अहमदनगर येथे येणार असल्याचे सांगितले व आम्हाला देखील अहमदनगर येथे येवुन त्यांना भेटण्याचे सांगितले आहे. त्याप्रमाणे आज दि.18/09/2024 रोजी मी व माझा मुलगा गोपाल राऊत असे श्री.मनवरे यांची अहमदनगर

येथे ते सांगतील त्या ठिकाणी जावुन भेट घेणार आहोत व आमच्या मोजणीच्या कामकाजासंदर्भात चर्चा करणार आहोत. त्या दरम्यान त्यांनी आमचे क्षेत्राची मोजणी केल्याच्या मोबदल्यात तसेच कोर्टात रिपोर्ट पाठविण्याच्या मोबदल्यात आमचेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरुध्द कारवाई करणेबाबतची तक्रार सांगीतली. लकवा या आजाराने मला लिहिता येत नसल्याने माझी लाचमागणीबाबतची तक्रार माझे सांगण्याप्रमाणे माझ्या मुलाने त्याच्या स्वहस्ताक्षरात लिहीली.

त्यानंतर मी मनवरे यांचे विरूध्द नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पो.उपअधी. श्री. त्रिपुटे यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर श्री. त्रिपुटे यांचे सुचनेप्रमाणे पोकॉ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमरीकार्ड टाकले. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये श्री. त्रिपुटे, दोन्ही पंच, मी व मुलगा गोपाळ यांनी निवेदन केले. त्यानंतर मनवरे हे कोठे भेटतील याबाबत खात्री करण्याकरीता माझा मुलगा गोपाळ याने त्यांना फोन केला. त्यावेळी मनवरे यांनी ते नगरमध्येच आहेत, एक तास लागेल, आल्यावर कॉल करतो असे सांगितले. त्यानंतर मनवरे यांचेविरुध्द लाचमागणी पडताळणी कारवाई अहमदनगर शहरातील सुरक्षित ठिकाणी जावुन करण्याचे ठरले. श्री.त्रिपुटे यांनी आम्हास वाहनाबाबत विचारले असता आम्ही एसटी बसने आलो आहोत असे सांगितले. त्यानंतर श्री. त्रिपुटे यांनी आम्हास पंच नं. 2 यांचे दुचाकी वाहन उपलब्ध करून दिले. त्यानंतर आम्ही श्री.त्रिपुटे यांनी सांगितल्याप्रमाणे शासकिय वाहनाचे पाठोपाठ आम्हास उपलब्ध करून दिलेल्या वाहनाने अहमदनगर शहरातील सुरक्षित ठिकाणी आलो.

त्यानंतर पो.उपअधी.श्री.त्रिपुटे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला, माझे मुलास व पंच न.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर थोडया वेळाने माझे मुलाचे मोबाईलवर मनवरे यांचा फोन आला, त्यात त्यांनी ते त्यांच्या नगरच्या आफिसला आहेत, एक ते दिड तास काम लागेल, चक्कर मारा असे सांगितले. त्यामुळे मनवरे यांची भेट घेण्यासाठी आम्हाला जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, अहमदनगर येथे रवाना करण्याचे ठरले.

त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझे गळयात अडकवला. श्री. त्रिपुटे यांनी मनवरे यांच्या भेटीकरीता 13.21 वा. दरम्यान मला व माझे मुलास आम्हाला उपलब्ध करून दिलेल्या दुचाकी मोटारसायकलवरून व पंच न. 1 हे त्यांना उपलब्ध करून दिलेल्या मोटारसायकलवरून रवाना झालो. आम्ही मनवरे यांची जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, अहमदनगर या कार्यालयाच्या पार्किंगमध्ये भेट घेतली. आमचेत आमच्या क्षेत्राच्या मोजणीबाबत चर्चा झाली. त्या दरम्यान मनवरे यांनी आमच्याकडे आमचे वर नमुद क्षेत्राची मोजणी केल्याच्या मोबदल्यात व मोजणीचा रिपोर्ट मा. न्यायालयात दाखल करण्यासाठी 25,000 ते 30,000/-रुपये लाचेची मागणी करून त्याचा पहिला हप्ता म्हणुन 10,000/- रुपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर आम्ही आमचेकडील दुचाकी वाहनांनी सापळा पथक थांबले त्या ठिकाणी 14.00 वा. दरम्यान परत आलो.

त्यावेळी पोउपअधी.श्री.त्रिपुटे यांनी पंच क्र. 1, मला व माझे मुलास घडलेल्या हकीकतीबाबत विचारली असता आम्ही वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पोउपअधी.श्री.त्रिपुटे यांनी पंचांसमक्ष व्हॉईस रेकॉर्डींग मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता मनवरे यांनी आमच्याकडे आमचे वर नमुद क्षेत्राची मोजणी केल्याच्या मोबदल्यात व मोजणीचा रिपोर्ट मा. न्यायालयात दाखल करण्यासाठी 25,000 ते 30,000/-रुपये लाचेची मागणी करून त्याचा पहिला हप्ता म्हणुन 10,000/- रुपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

लाच रक्कम म्हणुन देण्यासाठी मी माझ्या बचतीतुन 10,000/-रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 20 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. पोउपअधी.श्री.त्रिपुटे यांनी सदर सापळा कारवाईमध्ये अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. मी हजर केलेल्या नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले. त्यानंतर नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. लकवा आजाराने मला हाताने काही काम करता येत नसल्याने सदर लाच रक्कम माझ्या मुलाच्या ताब्यात दिली. पो.उपअधी.श्री. त्रिपुटे यांनी सापळा कारवाईबाबत मला, माझे मुलास व सापळा पथकास आवश्यक त्या सुचना दिल्या व लाच स्वीकारल्यानंतरचा नियोजीत इशारा ठरवुन दिला.

श्री. त्रिपुटे यांचे सुचनेवरून पोकॉ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरीकार्ड टाकले. त्यानंतर मनवरे यांचेविरुध्द जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, अहमदनगर येथे सापळा लावण्याचे ठरले. पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून माझ्या गळयात अडकविला. श्री.त्रिपुटे यांनी मला आणि माझे मुलाला उपलब्ध करून दिलेल्या दुचाकीने व पंच नं. 1 यांना त्यांना उपलब्ध करून दिलेल्या दुचाकीने मनवरे यांनी मागणी केलेली लाच रक्कम त्यांना देण्यासाठी जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, अहमदनगर येथे जाण्याकरीता 14.50 वा. दरम्यान रवाना करण्यात आले. आमचे पाठोपाठ श्री.त्रिपुटे व सापळा पथक असे येवुन जिल्हा अधीक्षक भूमि

अभिलेख कार्यालयाच्या खालील पार्किंगच्या परिसरात कोणास संशय येणार नाही अशा पध्दतीने सापळा लावुन थांबले.

माझे मुलाने मनवरे यांना तीन चार वेळा फोन केले असता त्यांनी फोन घेतला नाही. आम्ही बराच वेळ थांबुन मनवरे यांची वाट पाहिल्यानंतर मनवरे यांनी माझे मुलास फोन केला व त्यांना बराच वेळ लागेल, तुम्ही गेले तरी चालेल, साहेब बरोबर आहेत, त्यांना शेवगावला सोडायचे आहे, आज भेटणे अशक्य आहे असे म्हणाले. माझ्या मुलाने त्यांना उदया थांबले तर चालेल का असे विचारले. त्यानंतर आम्ही सर्वजण तेथुन निघुन रवाना केले त्या ठिकाणी परत आलो. त्यानंतर पंचनाम्याची पुढील कारवाई करण्यात आली. मनवरे यांचेविरुध्द दि.19/09/2024 रोजी सापळा आयोजित करण्याचे ठरल्याने श्री.त्रिपुटे यांनी आम्हाला दि.19/09/2024 रोजी 12.00 वा. ला.प्र.वि.कार्यालयात हजर राहण्याच्या सुचना देवुन जाणरास सांगितले.

दि.19/09/2024 रोजी आम्ही ला.प्र.वि. कार्यालयात हजर झालो. मनवरे हे कोठे भेटतील याबाबत खात्री करण्याकरीता माझे मुलाने त्यांना फोन केला असता त्यांनी आज आपली भेट होणार नाही, पुढच्या आठवडयात भेट होईल असे सांगितले. त्यानंतर मनवरे यांचेविरूध्द पुढील सापळा कारवाई त्यांचेशी संपर्क झाल्यानंतर करण्याचे ठरले.

दि. 02/10/2024 रोजी माझ्या मुलाने मनवरे यांना फोन करून आम्ही गावी आलो आहोत असे कळविले असता त्यांनी उदया दुपारी ते पाथर्डी येथील आफिसला येणार असल्याचे व त्यावेळी ते भेटतील असे सांगितले. सदर बाबत माझे मुलाने श्री.त्रिपुटे यांना माहिती दिली. श्री.त्रिपुटे यांनी आम्हास दि.03/10/2024 रोजी पाथर्डी येथे सुरक्षित ठिकाणी थांबण्याबाबत सुचना दिल्या.

दि. 03/10/2024 रोजी 12.00 वाजेदरम्यान श्री.त्रिपुटे व सापळा पथक असे पाथर्डी येथील आम्ही थांबलो त्या सुरक्षित ठिकाणी आले. मनवरे यांना फोन लावुन ते कोठे भेटतील याबाबत खात्री करून त्या ठिकाणी त्यांचेविरुध्द लाचेचा सापळा आयोजित करण्याचे ठरले. त्याप्रमाणे माझे मुलाने मनवरे यांना फोन करून कोठे आहेत याबाबत विचारले असता मनवरे यांनी ते तिसगाव मध्ये आहेत, त्यांना अर्धा तास लागेल असे सांगितले. माझे मुलाने आम्ही शिक्षक कॉलनीत आहोत, शिक्षक कॉलनीच्या समोरील रोडवर भेटु असे सांगितले असता मनवरे यांनी चालेल ठिक आहे असे सांगितले. सदरचा फोन व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड करण्यात आला. त्यानंतर मनवरे यांचेविरुध्द पाथर्डी शहरातील शिक्षक कॉलनीच्या कमानी समोरील अहमदनगर-पाथर्डी रोडवर लाचेचा सापळा लावण्याचे ठरले.

श्री.त्रिपुटे यांनी आम्हाला सापळा कारवाईबाबतच्या सर्व सुचना समजावुन सांगितल्या. लाचेच्या नोटा माझे मुलाच्या ताब्यात देण्यात आल्या. पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून माझे गळयात अडकवुन दिले. श्री. त्रिपुटे यांनी मला आणि माझे मुलाला उपलब्ध करून दिलेल्या दुचाकीने व पंच नं. 1 यांना त्यांना उपलब्ध करून दिलेल्या दुचाकीने मनवरे यांनी मागणी केलेली लाच रक्कम त्यांना देण्यासाठी पाथर्डी शहरातील शिक्षक कॉलनी समोरील अहमदनगर-पाथर्डी रोडकडे जाण्याकरीता 14.19 वा. दरम्यान रवाना केले. आमचे पाठोपाठ श्री.त्रिपुटे व सापळा पथक असे येवुन पिक्षक कॉलनीच्या कमानी समोरील रोडवर कोणास संशय येणार नाही अशा पध्दतीने सापळा लावुन थांबले. माझे मुलाने मनवरे यांना फोन करून विजय हॉटेल जवळ आलोय कुठे आहेत असे विचारले असता मनवरे यांनी वृंदावन हॉटेलच्या सावलीत आहे असे सांगितले. त्यानंतर आम्ही शिक्षक कॉलनीच्या कमानी समोरील रस्ता क्रॉस करून गेलो असता तेथे मनवरे हे त्यांचे चारचाकी वाहनाने आले. आमचेत व मनवरे यांचेत आमचे क्षेत्राच्या मोजणीबाबत व रिपोर्टबाबत चर्चा झाली. माझे मुलाने लाचेची रक्कम मनवरे यांचे समोर धरली असता त्यांनी ती रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारुन त्यांचे उजवे हातात ठेवली. त्यावेळी माझे मुलाने सापळा पथकास लाच स्वीकारल्याबाबतचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी आजुबाजुला उभे असलेले सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी लोकसेवक मनवरे यांना लाच रकमेसह 14.37 वा. सुमारास रंगेहाथ पकडले. त्यावेळी पो.उपअधीक्षक श्री. त्रिपुटे यांनी त्यांना त्यांचे नाव व पता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव संजय भिमराव मनवरे, वय 55 वर्षे, निमतानदार, उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, पाथर्डी, रा. भगवाननगर, पाथर्डी, ता.पाथर्डी, जि. अहमदनगर असे सांगितले. त्यानंतर पो.उपअधी.श्री त्रिपुटे यांनी मनवरे यांचे ताब्यातुन सदरची लाचेची रक्कम पंच क्र.2 च्या मदतीने ताब्यात घेतली. त्यानंतर पुढील कामकाज करण्यासाठी शासकिय विश्रामगृह, पाथर्डी येथे जाण्याचे ठरले. श्री.त्रिपुटे यांनी मला शासकिय वाहनाच्या पाठोपाठ शासकिय विश्रामगृह पाथर्डी येथे येण्याचे सांगितले. शासकिय विश्रामगृह, पाथर्डी या ठिकाणी पंचनाम्याचे पुढील कामकाज करण्यात आले.

तरी दि. 18/09/2024 रोजी लाचमागणी पडताळणी कारवाईच्या वेळी 13.21 वा. ते 14.00 वा. च्या दरम्यान लोकसेवक संजय भिमराव मनवरे, वय 55 वर्षे, निमतानदार, उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, पाथर्डी, रा. भगवाननगर, पाथर्डी, ता.पाथर्डी, जि.अहमदनगर यांनी माझे नावे कासारपिंपळगाव येथे असलेल्या क्षेत्राची मोजणी केल्याच्या मोबदल्यात व मोजणीचा रिपोर्ट मा. न्यायालयात दाखल करण्यासाठी 25,000 ते 30,000/-रुपये

लाचेची मागणी करुन त्याचा पहिला हप्ता म्हणुन 10,000/- रुपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले व दि. 03/10/2024 रोजी यशस्वी सापळा कारवाई दरम्यान 14.19 ते 14.37 वा. दरम्यान मनवरे यांनी सदरची रक्कम माझा मुलगा गोपाळ राऊत याचेकडुन माझ्या व पंचासमक्ष स्वीकारली म्हणुन माझी त्यांचे विरुध्द फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

santosh ramchandra mutkule(I (Inspector)) /

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**No.**(क्र.):

**Rank** (पद):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्र... खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of despatch to the court**
(न्यायालयात पाठविल्याची तारीख व वेळ):

6435

पोलीस ठाणे अंमलदार
पाथर्डी पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): santosh ramchan...
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):